## संकेत

कामाच्या व्यापातून
रोजच्या दिनचर्येतून
जरा बाजूला गेलं,
की हटकून तिची आठवण येते.
मग एका प्रतिक्षिप्त क्रियेसारखं-
हं, अगं कशी आहेस?
खूप दिवसात बोलणं नाही..
कामासाठी इकडे जरा आलो होतो
चार दिवसंच गं. बघ जमलं तर कर फोन...
ती पण तिच्या कामातच असते.
फोनच्या स्क्रीनवर त्याचं नाव झळकतं,
आणि मग तिच्याही ओठभर हसू उजळतं!
ती उत्तरादाखल पटकन एक स्माईली डकवते
आणि “बोलूच” लिहून परत कामात बुडते.
दोन दिवस तसेच जातात..
तो त्याच्या आणि ती तिच्या कामात व्यग्र होतात
मग अचानक कुणाला तरी परत आठवण
मग दोघांकडून २-४ मिस्ड कॉल्स..
बोलणं नाहीच...
पण त्याला आठवण झाली म्हणून
ती सुखावलेलली असते.
तिचा रिस्पॉन्स आला म्हणून
त्यालाही समाधान!
संभाषण न होताही
नातं दोन पावलं पुढं गेलेलं असतं,
वीण अजून घट्टं झालेली असते.
मैत्री जेंव्हा एवढी समजूतदार होते,
तेंव्हा बेरीज वजाबाकी सर्व विसरते.
आपापल्या व्यापात राहूनही

परस्परांची नकळत साथ देते.
तो त्याच्या आणि ती तिच्या आयुष्यात
सुखीच असतात
तो त्याच्या आणि ती तिच्या कामात
बिझीच असतात
पण "आठवणीचे" हे संकेत
मैत्रीची जाण जागती ठेवतात!!

**© प्रीती देशपांडे**